International Year of Cooperatives 2025

महाराष्ट्र शासन
सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय
नविन मध्यवर्ती इमारत, दुसरा मजला, ५, बी.जे.रोड, पुणे-४११००१.
दूरध्वनी क्र.: २६१२२८४६/४७ Email - commpat2018@gmail.com

जा.क्र.सआ-५/पत/निमं-MIS/SOP/२७०१ /२०२५ दिनांक :-७ नोव्हेंबर, २०२५

प्रति,

१) विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था (सर्व)

२) जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था (सर्व).

**विषय :- महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांचे Management Information System या प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबत सुचना.**

उपरोक्त विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत असून त्याचे अवलोकन करावे.

महाराष्ट्र राज्य बिगर कृषि सहकारी पतसंस्था नियामक मंडळ, पुणे यांनी राज्यातील सर्व नागरी / ग्रामीण बिगर कृषी / पगारदार कर्मचारी सहकारी पतसंस्थांचे कामकाजाची माहिती एकत्रित करण्यासाठी 'मे.कल्प टेक्नॉलॉजीस् प्रा.लि., पुणे' या कंपनीमार्फत **'Management Information System'** ही ऑनलाईन प्रणाली विकसित केली आहे. सदर प्रणालीची लिंक खालीलप्रमाणे आहे.

**https://patsansthaniyamakmandal.in**

सदर ऑनलाईन प्रणालीमध्ये माहिती भरण्याबाबत खालीलप्रमाणे सुचना निर्गमित करण्यात येत आहेत.

१) सदर प्रणालीमध्ये **दि.३१/०३/२०२५ अखेरची** माहिती भरावयाची आहे.
२) प्रणालीमध्ये भरावयाच्या रकमा **'प्रत्यक्ष रुपयांमध्ये'** नमूद कराव्यात.
३) संस्थेने प्रथम 'प्रोफाईल' (Profile) तयार करणे आवश्यक आहे. त्यासाठी मुख्यपृष्ठावरील 'संस्था नोंदणी' या मेन्युवर क्लिक करुन संस्थेची आवश्यक माहिती भरण्यात यावी.
४) आपल्या संस्थेची नोंदणी पूर्ण झाल्यावर, अधिकृत व्यक्तीच्या ई-मेलवर लॉगइन यूजर आयडी व पासवर्ड मिळेल.
५) यूजर आयडी व पासवर्ड वापरून लॉगइन करावे. लॉगइन झाल्यावर 'एडिट प्रोफाइल' मध्ये आपण आपला पासवर्ड बदलू शकता.
६) MIS Overview २०२४-२५ मधील 'माहिती भरा' या बटणवर क्लीक करून संस्थेची माहिती भरावी.
७) संस्थेची संपूर्ण माहिती भरण्यासाठी विविध टॅब उपलब्ध करून दिले आहेत - (१) सर्वसाधारण माहिती (२) भांडवल (३) कर्ज व वसुली (४) गुंतवणूक (५) आर्थिक (६) अंशदान (७) इतर

८) माहिती भरण्यासाठी संस्थेचा दि.३१/०३/२०२५ अखेरचा (१) सन २०२४-२५ चा वार्षिक अहवाल, (२)संस्थेचा MIS अहवाल मधील माहिती उपयुक्त ठरेल.

९) 'भांडवल' टॅब मधील 'एकूण सर्व प्रकारच्या ठेवी' व 'ठेवींचे वर्गीकरणातील रक्कम' जुळणे आवश्यक आहे.

१०) 'कर्ज व वसुली' टॅब मधील 'एकूण येणे कर्ज' व 'एकूण तारणी कर्ज व एकूण विनातारणी कर्ज' यांच्या रकमा जुळणे आवश्यक आहे.

११) माहिती भरुन झाल्यावर 'जतन करा आणि पुढे जा' या बटनवर क्लिक करून पुढील टॅबवर जाता येईल.

१२) सर्व माहिती भरुन झाल्यावर भरलेली माहिती एकदा तपासून घ्यावी आणि भरलेली माहिती अचूक आणि खरी असल्याची स्वयंघोषणा करून आपला फॉर्म सबमिट करावा.

१३) माहिती सबमिट करायच्या आधी तुम्ही माहितीमध्ये बदल करू शकता. माहिती सबमिट केल्यानंतर सदर माहितीमध्ये बदल करता येणार नाही.

१४) अंशदानाबाबत सन २०२०-२१ / २०२१-२२ / २०२२-२३ / २०२३-२४ या आर्थिक वर्षांची माहिती भरण्यासाठी मुख्यपृष्ठावर (Home Page) स्वतंत्र टॅब उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

सोबत (१) प्रणालीमध्ये प्रोफाईल तयार करणे व माहिती भरणेबाबतचे प्रेझेंटेशन व (२) माहिती भरावयाची विविध विवरणपत्रे यांची प्रत जोडली आहेत.

उपनिबंधक / सहाय्यक निबंधक, तालुका / वार्ड यांनी त्यांचे कार्यक्षेत्रामधील सर्व बिगरकृषि पतसंस्था तसेच ज्या बिगरकृषी पतसंस्थांचे मुख्यालय त्यांचे कार्यक्षेत्रामध्ये आहे अशा सर्व संस्थांची माहिती दि.१५/१२/२०२५ पर्यंत बिनचूक भरून घ्यावयाची आहे.

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था हे या कामकाजासाठी नियंत्रण अधिकारी म्हणून कामकाज पाहतील. जिल्ह्यातील सर्व पतसंस्थांची माहिती विहीत मुदतीत भरली जाईल याची जबाबदारी त्यांची राहील. सदर कामकाजा संदर्भात दि.१०/११/२०२५ रोजी [illegible] व्हिडीओ कॉन्फरन्स द्वारे आढावा बैठक आयोजित केली आहे. सदर व्हिडीओ कॉन्फरन्सची लिंक आपणांस अलहिदा कळविण्यात येईल.

प्रणालीबाबत कोणतीही तांत्रिक समस्या असल्यास, खालील ईमेलद्वारे संपर्क साधावा.

ई-मेल : support@patsansthaniyamakmandal.in
Mobile : ९०२१९००५७६ (श्री.कमलेश जेधे)
वेळ : सोमवार ते शुक्रवार (सकाळी १०: ०० ते सायंकाळी ६:००)

**(दिपक तावरे** भा.प्र.से.)
सहकार आयुक्त व निबंधक,
सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :-

अध्यक्ष / मुख्य कार्यकारी अधिकारी, पतसंस्था फेडरेशन (सर्व)